कैलेब आणि केट



विलियम, मराठी : अश्विनी बर्वे

कैलेब आणि केट




कैलेब आणि केट


विलियम, मराठी : अश्विनी बर्वे





कैलेब सुतार होता आणि केट विणकर होती. दोघे एकमेकांवर प्रेम करत होते. पण सारखे नाही, कधी कधी त्यांच्यात छोट्या छोट्या कारणामुळे मतभेद सुद्धा होत असत. मग ते दोघे कुत्र्यामांजरा सारखे भांडत, ते बघून असे वाटत नसे की ते दोघे पतीपत्नी आहेत.







एक दिवस त्या दोघामध्ये मोठ्ठे भांडण झाले,कैलेब नाराज होऊन पत्नीवर राग दाखवण्यासाठी घराचा दरवाजा धडकन बंद केला.केटही तिच्या पतीला खोट्या खोट्या निवडक शिव्या देत होती.



कैलेब घराच्या जवळ जंगलात फिरत होता, या चिडचिड्या बाईशी मी का लग्न केलं? तो विचार करत राहिला.थोड्यावेळ चालल्यानंतर त्याचा राग शांत झाला आणि तो का भांडला होता हेही तो विसरून गेला.त्याच्या एवढेच लक्षात होते की त्याचे त्याच्या बायकोवर खूप प्रेम आहे, तिचा सुंदर चेहरा, तिचे हसणे,आणि तिने तयार केलेले चविष्ट पुडिंग त्याच्या लक्षात होते.



घरी जाऊन बायकोला भेटण्या ऐवजी कैलेबने जंगलातील वाळलेली झाडं बघण्याचे ठरवले. ज्यामुळे काही दिवसांनी त्या झाडांना कापण्यासाठी आरा मशीन आणण्याचे ठरवले. जंगलात फिरता फिरता त्याचे पाय दुखायला लागले. विश्रांतीसाठी तो एका ठिकाणी लवंडला आणि त्याला झोप लागून गेली.



थोडया वेळाने तिथे येदिदा नावाची चेटकीण आली.ती जंगलात गुहेत राहत होती.ती चप्पलेचा फटक फटक आवाज करत आली. तिने काही मंत्र म्हटले. ती कैलेबच्या जवळ आली तेव्हा तो घोरत होता. “मी चांगल्या मुहूर्तावर इथे आले आहे” तिने खुश होऊन म्हटले. माझ्या चुलत भावाने मला नवीन जादू शिकवली आहे, ती वापरून बघण्याची चांगली संधी आहे.”

मग येदिदा कैलेबच्या जवळ बसली आणि तिने हाडासारख्या अंगठ्याने कैलेबच्या डाव्या करंगळीला स्पर्श केला.तरीपण कैलेबला जाग आली नाही.तिने आपला मंत्र म्हणायला सुरुवात केली.

अम्मी व्हाम्मी,

इब्बिन बम्मी,


आता होईल,

बाऊ, वाओ वाओ


चेटकिणी जवळ एक सुताराच्या ऐवजी एक कुत्रा झोपलेला होता. “व्वा काय भारी जादू आहे!” चेटकीण स्वतःलाच म्हणाली. दिवसभराचे वाईट कामे तिची करून झाल्यामुळे ती आनंदाने तिच्या गुहेत परत गेली.


जेव्हा कैलेब जागा झाला तेव्हा सूर्य बुडला होता. आधी त्याने जांभई दिली, आपली पाठ सरळ केली आणि मग आपल्या बगलेत कुरवाळले,पण कशाने पायाने? अरे हे काय झाले!त्याचे तोंड उघडे तर उघडेच राहिले आणि तो फक्त बघत राहिला.त्याच्या विजार आणि बेल्टच्या जागी कुत्राचे दोन केसाळ पाय होते.

तो घाईघाईने आपल्या चार पायांवर उभा राहिला! तो खूप घाबरला होता. त्याने वळून स्वतःला पाहण्याचा प्रयत्न केला. त्याने जे पाहिले त्यावर त्याचा विश्वास बसला नाही. छे अशा गोष्टी होत नाहीत. बापरे? हा तर मी कैलेब आहे. त्याच्या लक्षात आले की, तो काही स्वप्न बघत नव्हता.तर तो खरच कुत्रा झाला होता.



आता मी परत घरी जावून सगळं काही सांगण्याचा प्रयत्न करतो. मग तो त्याच्या त्या त्रासदायक अवस्थेत हळूहळू घराकडे निघाला. त्याची शेपटी डावीकडे –उजवीकडे हालत होती.जगातला हा असा कोणता चमत्कार होता की तो कुत्रा झाला? पण तेच खरं होते.काही वेळापूर्वी तो कैलेब एक सुतार होता. त्याच्या डोक्यातही कैलेबचेच विचार होते. आता तो पळत पळत त्याच्या बायकोकडे – केट कडे घरी जात होता. काय हे बरोबर आहे ना?पण त्याला चार पाय होते आणि त्याचे मन खूपच उदास होते.





रात्र झाली होती आणि आकाशात चंद्रही दिसू लागला होता. बिचारी केट एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जात होती. आणि परत परत खुर्चीशी तिची टक्कर होत होती. ती घाबरली होती. तिने कितीतरी वेळा बाहेर जावून बघितले होते, पण कैलेब चा काहीच पत्ता नव्हता. तिचा नवरा तिला कायमचा सोडून गेला होता का? तिने स्वतःलाच विचारले. नाही नाही तिच्या नवऱ्याचे तिच्यावर खूप प्रेम होते. तो सारखा हे बोलून दाखवत होता. कैलेब तिच्यावर वैतागला तर नसेल ना? की त्याला काही झाले तर नसेल ना? काय माहित?



जेव्हा कैलेब दरवाज्याजवळ आला तेव्हा त्याला आत यायला तो कचरत होता. त्याला कुत्राच्या रुपामुळे लाज वाटत होती. पण त्याने हिम्मत करून दरवाजा आपल्या पंज्याने वाजवला. केटने दार उघडले. तो दोन पायांवर उभा राहिला आणि दोन पाय केटच्या एप्रनवर ठेवले. आणि म्हटले की,केट मी कैलेब आहे. पण त्याच्या तोंडातून फक्त घुरघुर आवाज येत होता.त्याने केटला हाका सुद्धा मारल्या. पण काही उपयोग झाला नाही.



“बिचारा, हरवलेला कुत्रा दिसतोय!” केट म्हणाली.केटने एका ग्लासात त्याला पिण्यासाठी पाणी दिले आणि उरलेल्या मटणाचा तुकडा सुद्धा दिला. कैलेबने पोटभर पाणी प्यायले पण काही खावेसे त्याला वाटले नाही. जेव्हा केट शाल पांघरून कैलेबला शोधण्यासाठी जात होती,तेव्हा कैलेबने तिची चप्पल तोंडात धरूली आणि तिला अडवले.

“वेडपटा एका बाजूला बस” केट त्याला रागवली. “माझ्याजवळ तुझ्याशी खेळण्यासाठी वेळ नाही. मला माझ्या प्रिय पतीला शोधायचे आहे. कोणास ठावूक तो एखादया संकटात सापडला असेल. मग कैलेबने तिच्या चप्पल सोडल्या आणि तोपण तिच्या मागे मागे जावू लागला.



ते दोघे जंगलात फिरत होते, केटला कैलेब कसा सापडणार?

तो तर तिच्या मागे मागे फिरत होता.

आता त्याची सावली आणि आकार कुत्र्यासारखी होती.



केट सकाळी दमून-भागून घरी परत आली. तिच्या चपला दवाने ओल्या झाल्या होत्या. मग ती त्या खुर्चीवर बसल्या बसल्या झोपली. जी खुर्ची तिच्या पतीने बनवली होती. आता तिचा नवरा तिच्या पायाजवळ बसला होता.




दुपारी उठल्यानंतर केटने कैलेबला खूप शोधले.तो तिच्या मागे मागे जात होता. थोड्यावेळाने तो जमीन हुंगायला लागला. तसे तर त्याची काही गरज नव्हती.



नंतर केट शहरात गेली आणि तिने दारूचे अड्डे, पोस्ट ऑफिस, दुकाने आणि रस्त्यावर सगळीकडे कैलेबची चौकशी केली. सगळ्यांनी आपली चिंता व्यक्त केली आणि मदतीचे आश्वासन दिले. पण त्यापैकी कोणीही कैलेबला पाहिले नव्हते.

जेव्हा केट रात्री पलंगावर जावून झोपली तेव्हा कैलेब आपल्या जागी केटच्या जवळ जावून झोपला. त्याने केटला जवळ घेतले आणि तिच्या मानेची पापी घेतली. कैलेब रोज असेच करत असे. मग त्याने आपले दिवसभराचे दुःख सांगितले. केटला कुत्र्याची गरमी चांगली वाटली. तो बरोबर असल्यामुळे तिला एकटेपणा वाटला नाही.



मग केट आपला हात कैलेबच्या अंगावर टाकून झोपली. पण कैलेब रात्रभर जागाच राहिला. तो विचार करत होता, चिंता करत होता. की त्याची ओळख केटला कशी सांगावी? तो कुत्रा नाहीतर कैलेब आहे हे कसे सांगावे? माणसाच्या रुपात कसे यावे?केटपण कुत्रा झाली तर ते दोघे आनंदाने बरोबर राहू शकतील का?



केट ने कुत्र्याला स्वतःजवळ ठेवण्याचे ठरवले. तिने त्याच्यासाठी एक कॉलर आणली, त्यावर पितळ्याची बटणे होती.कुत्रा लाल रंगाचा होता. अगदी तिच्या नवऱ्याच्या केसांसारखा. म्हणून केटने त्याचे नाव रुफस ठेवले. तिने कुत्र्याला काही युक्त्या शिकवल्या,जसे मागच्या पायवर उभे राहणे, बसणे, शेकहँड करणे, वस्तू घेवून येणे, भो भो करत वस्तू मोजणे. आदि. जेव्हा रुफसने या गोष्टी पटपट शिकल्या तेव्हा केटला आश्चर्य वाटले.



जेव्हा केटचे मित्र घरी येत तेव्हा ती तिचा कुत्रा अभिमानाने दाखवत असे. कुत्र्याला सुद्धा लोकांच्या संगतीत, गप्पांमध्ये मजा येत असे. पण जेव्हा त्याचे जुने शत्रू त्याच्या डोक्यावरून हात फिरवत तेव्हा त्याला आवडत नसे.






केटला कुत्र्याबद्दल प्रेम वाटत होते. ते एकमेकांबरोबर राहत होते, पण ते खुश नव्हते..तिला नेहमीच तिच्या हरवलेल्या पतीची आठवण येत असे. तिला अजून पर्यंत कळले नव्हते की, तिचा पती तिला का सोडून गेला होता. कैलेबला वाटत होते की, तो जर त्याची पूर्ण कहाणी केटला सांगू शकला असता तर किती बरे झाले असते. तो केटच्या पायाजवळ बसून हाड चावत बसे आणि केट विणत राही. कधी-कधी केटच्या डोळ्यातून अश्रू येत आणि मग ती निराश होत खिडकीतून बाहेर बघत राही. तेव्हा कैलेब आपला पंजा तिच्या कंबरेवर ठेवून तिचा चेहरा चाटत असे. मग केट कुत्र्याचे कानावरून,पाठीवरून हात फिरवत म्हणे की, एवढा प्रामाणिक कुत्रा मिळाल्याने ती भाग्यवान आहे.

एक दिवस कैलेब झाडाखाली आराम करत होता आणि ताजा घास हुंगत होता,तेव्हा काही कुत्रे आले आणि त्याच्याबरोबर खेळायला लागले. कैलेबला हे खूप आवडत असे. पण लवकरच तो घरी परत आला. बाकी कुत्र्यांची घरात घुसण्याची हिंमत झाली नाही. कैलेबला कुत्र्यांबरोबर खेळण्यात मजा वाटे. पण त्याला आपले खरे रूप विसरायचे नव्हते.

ते कुत्रे एकदोन वेळा त्याच्या बरोबर आले पण कैलेबने त्यांना लिफ्ट दिली नाही. मग त्यांनी येण्याचे बंद केले.





अशारितीने एका नंतर एक असे कितीतरी महिने गेले. याकाळात कैलेब नेहमी त्या ठिकाणी जायचा जिथे त्याचे रुपांतर कुत्र्यात झाले. त्याला वाटे की तिथेच त्याला मुक्तीचे संकेत मिळतील.तो जिथे झोपला होता तिथे जावून त्याने झोपण्याचे नाटक केले. पण खरेतर तो डोळ्याच्या कोनातून सगळे बघत होता. त्याच्याजवळ खारूताई फिरत होत्या. झाडावर चिमण्या किलबिलत होत्या. पाने हवेने हालत होती.कैलेबला काही खास दिसले नाही. कैलेबने काही झाडांची पाने उगीच खाल्ली, निदान त्यामुळे तरी तो माणूस होईल.पण असे काही झाले नाही.

मग थंडी पडली, बर्फ पडू लागला.आता कैलेबला कुत्रा होऊन आठ महिने झाले होते. तो आगीजवळ बसून राहत असे आणि स्वतः शेकत असे. तो केटला घरात फिरतांना पाहत असे.तो कधी तिला खरे सांगू शकणार होता का? त्याने आशा सोडून दिली होती. जर केटला कुत्र्याचे खरेरूप कळले असते तर ती खुश झाली असती का? निदान तिला हे तर समजले असते की पतीने तिला सोडून दिले नाही. पण पतीच्या जागी तिला हा कुत्रा नवरा म्हणून चालला असता का?एखाद्यावेळेस नाही. असे कैलेबला वाटले.





नाताळानंतर काही दिवसांनी, एका चांदण्यारात्री घरात चोरांनी प्रवेश केला. तेव्हा सगळेजण झोपले होते. चोरांनी गुपचूप खिडकी उघडली आणि मग घरात घुसले. त्यांच्या बरोबर बर्फाची थंडी हवा आत आली. कैलेब उठला आणि भुंकायला लागला. तो सरळ त्यांना जावून चिकटला.

“या कुत्र्याला ठिकाणी लावा, छोटा चोर कुत्र्यापासून स्वतःला वाचवत ओरडला. कैलेबने त्याचा हात तोंडात दाबून धरला होता. उंच चोराने कैलेबची कॉलर पकडून ओढले पण कैलेबने आपले दात रुतवून ठेवले.



चोर ने अपना चाकू निकाला और फिर वो कैलेब को मारने दौड़ा. चाकू से कैलेब का अगला पंजा थोड़ा सा छिल गया. या आवाजामुळे केटची झोप मोडली. तिने पाहिले की तिचा बहादूर कुत्रा चोरांशी लढत होता. केट कुत्र्याच्या मदतीला धावली. ज्या चोराने कैलेबची कॉलर पकडली होती,केटने त्याचे केस ओढले. त्या चोराने केटला जमिनीवर पाडले आणि त्याने शिव्या दिल्या. त्याचवेळेस कैलेबने त्याला पकडले आणि त्या चोराला आपले धारदार दात दाखवले.



अरे ही तर कमालीची जादू आहे” कैलेबला काहीच दुखले नाही. त्याने फक्त एकदाच “आह” भरली आणि मग ज्या पंज्याला लागले होते तो पंजा तोंडात ठेवला. तर काय आश्चर्य त्याचा तो “पंजा” हात झाला. चोराने त्याच्या ज्या पंजाला दुखवले होते, ज्याच्यात चेटकिणीने जादू केली होती. आता जादू संपली होती. कैलेब परत कैलेब झाला होता. तो आपल्या जुन्या कपड्यामध्येच होता.

“मी आहे मी,“ कैलेब खुशीने म्हणाला. केट आश्चर्याने पाहतच राहिली. कैलेब”ती आनंदाने ओरडली. दोन्ही चोर हे सगळे बघून घाबरून खिडकीतून पळून गेले. ते एवढ्या जोरात पळाले की त्यांच्या पायांचे ठसेसुद्धा उमटले नाही.

कैलेब आणि केट दोघे एकमेकांच्या मिठीत सामावून गेले.
खूप वेळा नंतर जेव्हा त्यांना शुद्ध आली,तेव्हा कैलेबने केटला त्याची सगळी कहाणी सांगण्याचा प्रयत्न केला, त्याला जितकी समजली होती तेवढी कमीत कमी कहाणी त्याने सांगितली. पण खरी गोष्ट कधीच कोणाला कळली नाही. काही वेळेस खूप गोष्टी या अशा रहस्यच राहतात.



कैलेब आणि केट



नोटएबिल ALA (अमेरिकन लाइब्रेरी एसोसिएशन) पुस्तक

लहान मुलांचे अत्यंत सुंदर आणि सचित्र पुस्तक.